R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ७७

दि.०५ मार्च २०२६,वारः गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# मोदी हटाव, देश बचाव; आंदोलनात लाखोंचा जनसागर

## अमेरिकेसोबतचा व्यापार करार देशहितविरोधी - ड. प्रकाश आंबेडकर यांचा हल्लाबोल





मुंबई / के. एच. हनवते :-मोदी हटाव, देश बचाव; एपस्टीन फाइल्स, व्यापार धोरणावरून मुंबईतील वंचित च्या महाआंदोलनाला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला,

एपस्टीन फाइल्स आणि अमेरिकेशी सुरू असलेल्या कथित 'एकतर्फी' व्यापार धोरणावरून देशातील राजकीय वातावरण तापलेले असताना सोमवारी मुंबईत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाआंदोलन करण्यात आले. हे आंदोलन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात पार पडले.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत सारा मुंबई परिसर दनानु सोडला मोदी हटाव, देश बचाव..! तक्त बदल दो ताज बदल दो, बेईमानों का राज बदल दो..! राजीनामा दो राजीनामा दो, नरेंद्र मोदी राजीनामा दो..! इत्यादी घोषणाबाजी करत केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष : ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. तसेच मातंग मुक्ती सेनेसह अनेक सामाजिक संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला होता.

महाआंदोलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा उल्लेख कथितरित्या एपस्टीन फाइल्समध्ये झाल्याचा दावा करत पारदर्शक चौकशीची मागणी करण्यात आली. अमेरिकेशी सुरू असलेल्या व्यापार करारामुळे देशाच्या आर्थिक हितसंबंधांना धक्का बसत असल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. केंद्र सरकारने या मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनाला संबोधित करताना ड. प्रकाश आंबेडकर यांनी आरएसएस-इस्राईल संबंध, परराष्ट्र धोरण आणि अमेरिकेसोबतचे करार यावर टीका केली. भारत पुन्हा गुलामगिरीच्या दिशेने जात आहे. अमेरिकेसोबतचा व्यापार करार हा देशाच्या हिताविरोधात आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला. तसेच एपस्टीन प्रकरणाबाबत पंतप्रधानांनी खुलासा करावा, अशी मागणी आंबेडकर यांनी केली.

ड. प्रकाश आंबेडकर यांनी आखाती देशांमध्ये कार्यरत भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली. सुमारे दोन कोटींपेक्षा अधिक भारतीय आखाती देशांत कार्यरत असून, आंतरराष्ट्रीय तणाव वाढल्यास त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे ते म्हणाले.

देशाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी दुसऱ्या देशासमोर नाचतो त्याचा प्रश्न इथला मीडियाचा मालक विचारत नाही. त्यांना आमचा सवाल आहे, लोकांचा रोष शिगेला पोहोचताना दिसतोय. त्याला तुम्ही दाखवणार आहेत की नाही ? असा सवाल उपस्थित केला.

देशातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचा मुद्दा उपस्थित करत सरकारने जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहनही ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

या आंदोलनादरम्यान सीएसएमटी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मुंबईसह उपनगरांतून मोठ्या संख्येने कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. या आंदोलनात रेखा ठाकूर, प्रियदर्शी तेलंग, उत्कर्षा रुपवते, दिशा पिंकी शेख, सुजात आंबेडकर, चेतन अहिरे, स्नेहल सोहनी, सागर गवई, राजेंद्र पाटोडे, नीलेश विश्वकर्मा, अशोक साबळे, कॉ. मिलिंद रानडे, आतिक दफेदार, अविनाश भोसीकर, सचिन गायकवाड, नवी मुंबई वंचित कार्याध्यक्ष : संतोष जाधव, नवी मुंबई महासचिव : सुनील भोले, बेलापूर तालुका मा. उपाध्यक्ष कल्याणराव हनवते, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रमुख पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# फाल्गुन पौर्णिमेनिमित्त मिलिंद नगर बुद्ध विहारात रमाई महिला मंडळाकडून खीर वाटप



लातूर : फाल्गुन पौर्णिमेचे औचित्य साधून गाव भागातील मिलिंद नगर येथील माता रमाई बुद्ध विहारात रमाई महिला मंडळाच्या वतीने भक्तिभावाने खीर वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. बौद्ध धम्मातील पौर्णिमेला असलेले विशेष महत्त्व लक्षात घेऊन हा उपक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी बुद्ध वंदना, त्रिशरण-पंचशील आणि भीम स्मरण घेत धम्ममय वातावरण निर्माण केले.

या पवित्र दिवशी रमाई महिला मंडळातील महिलांनी पारंपरिक पांढऱ्या साड्या परिधान करून सामूहिकरित्या खीर वाटप केले. परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. श्रद्धा, समता आणि बंधुता यांचा संदेश देणारा हा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी रमाई महिला मंडळाच्या सौ. रमा अशोक हनवते, द्रोपती हनवते, सौ. रमा शृंगारे, सीमा जोगदंड, कोमलबाई कांबळे, अरुणा भुतकर, उकाबाई भुतकर, शारदा भुतकर, सुजाता कांबळे, जयश्री गायकवाड, कविता बनसोडे, कविता जोगदंड, मंगल बनसोडे, मीनाक्षी बनसोडे, प्रभावती बनसोडे, इंदुबाई बनसोडे, बीबी नंदा बनसोडे, गंगुबाई वाघमारे, सुशिलाबाई कांबळे आदी महिला उपस्थित होत्या.

फाल्गुन पौर्णिमेनिमित्त आयोजित या उपक्रमामुळे मिलिंद नगर परिसरात धार्मिक आणि सामाजिक ऐक्याचे वातावरण निर्माण झाले असून, अशा उपक्रमांमुळे समाजात धम्म मूल्यांची रुजवात होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# नंदा जडे यांचे दु:खद निधन



लातूर प्रतिनिधी : लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा लातूर समाचारचे संपादक दयानंद जडे यांच्या कनिष्ठ भगिनी सौ. नंदा शंकरराव जडे यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान निधन झाले. त्या ५९ वर्षांच्या होत्या. दि. ४ मार्च रोजी सायंकाळी खाजगी रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली.सौ. नंदा जडे या प्रशासकीय सेवेत कर्तव्यदक्ष व अभ्यासू अधिकारी म्हणून परिचित होत्या. महिला म्हणून प्रथमच तलाठी पदावर रुजू होत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यानंतर लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात मंडळ अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. काही महिन्यांपूर्वीच त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि लोकाभिमुख दृष्टीकोन यामुळे सहकाऱ्यांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली होती.त्यांच्या पश्चात पती राजेंद्र पंडित, तीन मुले, एक सुन व एक नातू असा परिवार आहे. त्या दयानंद जडे व विवेकानंद जडे यांच्या भगिनी म्हणूनही परिचित होत्या. त्यांच्या निधनामुळे जडे कुटुंबीयांवर तसेच परिचित वर्तुळात शोककळा पसरली आहे.

त्यांच्या पार्थिवावर दि. ५ मार्च रोजी सकाळी १० वाजता खाडगाव स्मशानभूमी येथे वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# गावोगावच्या यात्रांचे स्वरूप बदलायला हवे - प्रमोद सावंत.





जत / प्रतिनिधी :- गावोगावी भरणाऱ्या यात्रा आणि त्या यात्राचे स्वरूप पाहता धुळदेव यात्रा समितीने पाडलेला पांयडा हा एक नवा आदर्श निर्माण करणारा आहे. या यात्रेचे अनुकरण अनेक गावातील तरुणांनी त्यांच्या यात्रेसाठी करण्याची गरज आह, असे मत बनाळी गटातील पंचायत समिती सदस्य प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. ते आज कोकरेवस्ती येथील धुळदेव यात्रा समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. धुळदेव यात्रेचे हे सतरावे वर्ष असून, यावर्षी ग्रामीण साहित्यिक शिवाजी बंडगर यांना वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. शिवाजी बनगर यांनी त्यांच्या दमदार आवाजात ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, महिला, लहान मुले यांच्या वागण्या बोलण्यातील अनुभव टिपून त्याला गेय कवितांचे रूप दिले. त्या कवितांचे सादरीकरण करताना परिसरातील श्रोता अत्यंत मंत्रमुग्ध झाला होता. शेती, माती आणि नाती ही काळाच्या ओघात बदलत असून काही भागात ती हरवत चालली आहेत. ती टिकवण्यासाठी गावोगावी अशा कार्यक्रमांची गरज निर्माण झाली आहे. यावेळी आपल्या मनोगतात प्रभाकर जाधव यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात अशा पद्धतीने हसणं आणि बसणं हे शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने गरजेचा असुन त्यासाठी अशा यात्रांचे आयोजन करण्यात गावोगावच्या तरूणानी पुढाकार घ्यावा असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. श्रीकांत कोकरे यांनी प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त केले तर यात्रा समितीचे अध्यक्ष धुळाप्पा कोकरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

माणूस समजून घेताना या शीर्षकाखाली दुसऱ्या पर्वातील यावर्षीचे हे तिसरे पुष्प होते. श्रीयोग कोकरे यांनी माणूस समजून घेताना या सदराखाली शिवाजी बंडगर यांची मुलाखत घेतली ही मुलाखत श्रीयोग कोकरे यांच्या गेय कविता आणि शिवाजी बंडगर यांच्याही गेय कविता यांची एक उत्तम जुगलबंदीच ठरली. यापूर्वी विमल माळी, ज्ञानेश डोंगरे, आप्पासाहेब खोत, विश्वनाथ गायकवाड, ज्योतिराम फडतरे, जयवंत आवटे, रवींद्र कोकरे जीवन सावत यांच्यासारख्या अनेक दिग्गज ग्रामीण साहित्यिकांची या व्यासपीठावर साहित्यसेवा घडलेली आहे. यावेळी राज्य परिवहन मंडळातून सेवानिवृत्त झालेले सदाशिव कोकरे, नव्याने शिक्षक पदावर रुजू झालेल्या दीप्ती चौगुले, अंगणवाडी मदतनीस प्रतीक्षा खरात, अंगणवाडी सेविका कोमल कोकरे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अजिंक्यतारा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभाकर भाऊ जाधव, सांगली जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती संजय कुमार सावंत, माजी पंचायत समिती सदस्य रवींद्र सावंत, बनाळीचे उपसरपंच मंगेश सावंत, घेरडी गटातील माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ किसन माने, मांदेश महाविद्यालयातील प्रा. मुकुंद ओलेकर, बापू रणसिंगे, बनाळी सोसायटीचे चेअरमन बी. आर. सावंत सर, लवकुमार मुळे, प्रा. माणिक कोडक, डॉ. शिवाजी कुलाल, प्रा. सचिन लोखंडे, प्रा. वैभव चादवले, राहुल पाटील यांच्यासह अनेक महिला व पुरुष उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात यात्रा समितीचे सदस्य डॉ. बाळासाहेब कोकरे, भानुदास कोकरे, डॉ. अर्जुन कोकरे, अविनाश कोकरे, संजय कोकरे, सुनील कोकरे, मायाप्पा कोकरे, समाधान कोकरे, प्रथमेश शिंदे यांच्यासह अनेकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

## संपादकीय...

### राज्यसभेसाठी सक्षम आवाजाची गरज : बाळासाहेब आंबेडकर पर्याय ठरू शकतात का?

महाराष्ट्रातून राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी निवडणूक होणार आहे. सध्याच्या राजकीय गणितानुसार सहा जागा महायुती सहज जिंकू शकते, तर सातव्या जागेसाठी खरी राजकीय चुरस अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकारणात विविध शक्यता चर्चेत आहेत. विद्यमान सदस्यांपैकी रामदास आठवले, शरद पवार आणि प्रियंका चतुर्वेदी यांचा कार्यकाळ संपत आहे. त्यामुळे विरोधक कोणता चेहरा पुढे करतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर मविआ कडून वंचित बहुजन आघाडी चे राष्ट्रीय नेते ॲड. प्रकाश आंबेडकर (बाळासाहेब आंबेडकर) यांना राज्यसभेवर पाठवण्याचा प्रस्ताव असल्याची चर्चा रंगत आहे. या चर्चेला अधिकृत दुजोरा अद्याप मिळालेला नसला, तरी हा पर्याय राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरू शकतो, याबद्दल मतप्रवाह दिसत आहे.

आजच्या संसदीय राजकारणात राज्यसभेची भूमिका केवळ विधेयक मंजूर करण्यापुरती मर्यादित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत असते. सरकारच्या धोरणांवर सखोल चर्चा, घटनात्मक मूल्यांचे रक्षण आणि जनतेच्या प्रश्नांना ठाम आवाज देणे या बाबतीत प्रभावी उपस्थिती आवश्यक मानली जाते. अनेकदा विरोधकांची संख्या असली तरी धारदार मांडणी करणारे नेते कमी पडतात, अशी टीका होत असते.याच संदर्भात बाळासाहेब आंबेडकर यांचे नाव पुढे येते. कायद्याचे भक्कम ज्ञान, स्पष्ट आणि निर्भीड वक्तृत्व, तसेच तळागाळातील प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडण्याची त्यांची शैली या बाबी त्यांच्या समर्थकांकडून अधोरेखित केल्या जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांवर उघडपणे टीका करण्याची त्यांची तयारीही त्यांच्या राजकीय प्रतिमेचा भाग आहे.

समर्थकांचे म्हणणे असे की, आंबेडकर यांच्यावर कोणत्याही मोठ्या भ्रष्टाचाराचा ठोस आरोप नाही, तसेच ते कायद्याच्या चौकटीत राहून संघर्ष करणारे नेते म्हणून ओळखले जातात. संसदेत त्यांची उपस्थिती वाढल्यास सामाजिक न्याय, संविधान आणि वंचित घटकांचे प्रश्न अधिक ठळकपणे मांडले जाऊ शकतात, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.मात्र या चर्चेचा दुसरा पैलूही दुर्लक्षित करता येत नाही. राज्यसभेची निवड ही केवळ वैचारिक किंवा प्रतिमेवर आधारित नसून ती संख्याबळ, आघाड्या आणि दीर्घकालीन राजकीय रणनीतीवरही अवलंबून असते. विरोधकांसाठी व्यापक एकजूट साधणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना भावनिक अपेक्षा आणि राजकीय वास्तव यांचा समतोल साधणे आवश्यक ठरेल.तसेच, संसदेत प्रभावी भूमिका बजावण्यासाठी केवळ आक्रमक टीका पुरेशी नसते; विधिमंडळातील बारकावे, समिती कामकाज आणि सहमतीचे राजकारण याही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या असतात. या कसोट्यांवर संभाव्य उमेदवार कितपत उतरतात, याचाही विचार होणे गरजेचे आहे. एकंदरीत, महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी कोणाला पाठवायचे हा निर्णय विरोधकांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. जर विरोधकांना संसदेत अधिक ठाम आणि अभ्यासू आवाज उभा करायचा असेल, तर बाळासाहेब आंबेडकर यांचा पर्याय निश्चितच चर्चेला पात्र ठरतो. अंतिम निर्णय काहीही असो, तो व्यापक राजकीय परिणाम लक्षात घेऊन आणि लोकशाहीतील प्रभावी प्रतिनिधित्वाच्या निकषांवर आधारित असणे, हीच काळाची गरज आहे.

## जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ होईल अशा रस्त्यांना मुख्यमंत्री बळीराजा पांणद रस्ते योजनेत प्राधान्य द्यावे-आ. रमेशआप्पा कराड





लातूर-राज्य शासनाने नव्याने गठीत केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांणद रस्ता विधानसभा क्षेत्र समितीची बैठक समिती अध्यक्ष लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाली. मतदार संघात २५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम हाती घेतले जाणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ होईल अशा रस्त्यांना बळीराजा पांदण रस्ते योजनेत प्राधान्य द्यावे अशी सूचना या बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीतील मशागतीची कामे वेळेत व्हावीत, शेतमालाची सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे.

शासन निर्णयानुसार विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठीत करण्यात आलेली आहे. या लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची पहिली बैठक मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समिती अध्यक्ष आ. श्री. रमेशआप्पा काशिराम कराड यांचे अध्यक्षतेखाली दि.०४ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर येथे सकाळी ११ वाजता संपन्न झाली.

या बैठकीस मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समितीचे सचिव तथा लातूर उपविभागीय अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे, रेणापूर - औसा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी सुमित जाधव, लातूरचे श्याम गोडभरले, औसा गटविकास अधिकारी आनंद मिरकले, भूमि अभिलेख अभियंता अशोक चव्हाण, सा. बा. उपअभियंता गोबाडे, जिप बा. उप अभियंता एस जी कुलकर्णी, लेखा अधिकारी डी. एस. डांगे, कृषी अधिकारी एस. जी. कांबळे, दत्तात्र्य हाके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सदर बैठकीत आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील सर्व रस्त्यांची माहिती घेतली. पहिल्या टप्प्यात एकूण २५ किलोमीटर लांबीच्या रस्ते कामात रेणापूर तालुका दहा, लातूर तालुका दहा आणि औसा तालुका पाच किलोमीटरचे काम करण्यात यावे. लातूर ग्रामीण मतदार संघात यापुर्वी झालेल्या शेत आणि पाणंद रस्त्यांची माहिती अद्यापपर्यंत कोणत्याही योजनेमधुन रस्त्यांची कामे झालेली नाही अश्या सर्व रस्त्यांची माहिती संकलीत करण्यात यावी. ज्या ठिकाणी सदर शासन निर्णयानुसार रस्ता मजबुतीकरण करावयाचे आहे अशा रस्त्यांचे अतिक्रमण पोलिस विभाग व महसूल विभागाच्या समन्वयाने करावे. सदर रस्त्यांचे सिमांकन भुमी अभिलेख विभागाने तात्काळ करून देण्यात यावे अशा सुचना दिल्या.

येत्या काळात सुरू होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियाना अंतर्गत शासनाच्या विविध योजनेचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, निराधारांच्या पगारी यासह विविध योजनेचा लाभ मिळत असताना अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत. तेव्हा त्यांच्या त्रुटी दूर करण्याचे काम तातडीने करावे गायगोठे, विहिरी यासह विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असल्याबाबत नाराजी व्यक्त करून कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी अशा कडक शब्दात आ. रमेशआप्पा कराड यांनी बैठकीत सूचना दिल्या.

प्रारंभी समिती सचिव तथा उपविभागीय अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत /पांदन रस्ता योजने संदर्भात शासन निर्णयाची सविस्तर माहिती देऊन लातूर रेणापूर तालुक्यासह भादा सर्कल मध्ये एकूण ११४३ विविध शेत पांणद रस्ते असून त्यात गाव नकाशावर नोंद असलेले रस्ते ७६८ आणि नोंद नसलेले ३७५ रस्ते असल्याची माहिती दिली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी विद्यार्थी महिला यांच्या महसूल विभागाशी निगडित प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी येत्या मार्च ते मे दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. मा. तहसीलदार यांनी कोणती रस्ते खुले असून कोणते रस्ते अतिक्रमीत आहेत याबाबत माहिती दिली.

सदर योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानाअंतर्गत करण्यात यावा त्यादृष्टीने सर्वांनी तयारी करावी तसेच सदर रस्त्यांची निवड करताना रस्त्यांची स्थिती, आवश्यकता व गाव भेटी व शिवार भेटी आयोजित करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून निश्चिती करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश आ. कराड यांनी दिले.

## पुणे शहरात गुंगीकारक औषधांची विक्री करणाऱ्यावर कारवाई,- गृह राज्यमंत्री योगेश कदम

मुंबई, : पुणे शहरात विनापरवाना व डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गुंगीकारक औषधे नशा करण्यासाठी तसेच बेकायदेशीर खरेदी-विक्रीच्या उद्देशाने औषधांचा साठा बाळगल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य अभिजीत वंजारी यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, या प्रकरणात पाच जणांवर आरोप निश्चित करण्यात आला असून त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित तीन आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच या पाचही आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.जप्त करण्यात आलेली औषधे ही प्रमाणित असूनती कोणत्याही स्थानिक मेडिकल स्टोअरमधून विकत घेतलेली नाहीत.

तपासादरम्यान संबंधित औषधांचा पुरवठा बाहेरच्या राज्यातून झाल्याची माहिती पुढे आली असून पुरवठा साखळीचा तपास सुरू आहे. दरम्यान, पुणे शहरात बनावट नशेची औषधे तयार करणारी कोणतीही कंपनी आढळून आलेली नाही. पुणे शहरासह राज्यभरात अशा प्रकारच्या औषध विक्री संदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून नियमित कारवाई केली जात असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी यावेळी सांगितले.

## कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत - काढणीपश्चात पायाभूत सविधा बळकटीकरण

### कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

ठाणे(जिमाका) : देशाला कडधान्यामध्ये स्वयंपूर्ण बनविण्याकरिता व आयातीवरील अवलंबित्वता कमी करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी दि.११ ऑक्टोबर, २०२५ रोजी कडधान्य आत्मनिर्भरता अभियान कार्यक्रमाची सन २०२५-२६ ते सन २०३०-३१ पर्यंत राबविण्याची घोषणा केली आहे. राज्यात हे अभियान रब्बी हंगाम सन २०२५-२६ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तूर, उडीद व मसूर या प्रमुख कडधान्य पिकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनास चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत काढणीपश्चात पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी काढणीपश्चात प्रक्रिया युनिट (झीलर्शीीळपस णपळीं) स्थापन करण्यास सन २०२५-२६ या वर्षात आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या घटकासाठी वैयक्तिक अर्जदार, शेतकरी उत्पादक संस्था (ऋझजी), क्लस्टर स्तर महासंघ (उडऋी), प्राथमिक कृषी पतसंस्था (झ-उड) व महाराष्ट्रात विविध कायद्यांतर्गत नोंदणीकृत उपक्रम/संस्था लाभ घेण्यास पात्र राहतील. या घटकासाठी प्रकल्प खर्चाच्या ३३% किंवा रु.२५.०० लाख प्रति युनिट यापैकी जे कमी असेल ते याप्रमाणे अनुदान देय असणार आहे.

यानुषंगाने शेतकरी बांधवाना आवाहन करण्यात येते की, काढणीपश्चात प्रक्रिया युनिट (झीलर्शीीळपस णपळीं) घटकाचा लाभ घेण्याकरिता ऑफलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. घटक अंमलबजावणीबाबत कृषी विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचना लागू राहतील. याबाबतच्या अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी/जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत कृषी विभागाकडून विभागस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

ठाणे,(जिमाका) :- केंद्र शासन सहाय्यीत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (झचऋच्वए) असंघटित्त क्षेत्रातील सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगासाठी राबविली जात आहे. प्रधानमत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (झचऋच्वए) या योजनेंतर्गत कोकण विभागात २ हजार ८२ लाभार्थींनी लाभ घेतला आहे.

या योजनेचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी होण्याकरीता व या योजनेतून लाभ घेतलेल्या उदयोजकाना बाजारपेठ व ग्राहक उपलब्ध करून देणे तसेच शहरातील ग्राहकाना उत्तम दर्जावा माल उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभागामार्फत दि. ६ मार्च ते ८ मार्च २०२६ रोजी बाळासाहेब ठाकरे स्मारक तीन हात नाका फ्लायओव्हर, सर्व्हिस रोड, धर्मवीर नगर, ठाणे (पश्चिम) येथे विभागस्तरीय प्रदर्शन (वेळ सकाळी १०.०० ते रात्री ८.००) आयोजित करण्यात येत आहे.

या प्रदर्शनामध्ये विभागातील योजनेतर्गत लाभ घेतलेले किमान २५० अन्न प्रक्रिया उद्योजक लाभार्थी आणि अन्न प्रक्रिया उद्योगाशी सबंधित उदयोजक व जिल्ह्यातील खरेदीदार यांना एकत्र बोलविण्यात येणार असून त्यावी भेट घडवली जाईल. जेणेकरून भेटीमधून विक्रेते आणि खरेदीदार यांच्यामध्ये विपणनाकरिता नवीन संधी उपलब्ध होतील.

तसेच या प्रदर्शनात अन्न प्रक्रिया उद्योगाशी निगडीत यंत्रसामुग्री व साहित्य यांची दालने उपलब्ध असतील जेणेकरून सहभागी उ्द्योजकांना त्याचा फायदा होईल. नवीन तंत्रज्ञान, संशोधन याबाबतची माहिती मिळेल. तसेच वित्तीय पुरवठा करणारे, बँक, इ. सहभाग असेल. तसेच चडठङच् व डणङच् च्या बीज भांडवल व गट लाभार्थी महिलांना दालने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रदर्शनामध्ये अन्न प्रक्रियेशी निगडीत यंत्र सामुग्री, प्रक्रियायुक्त पदार्थ, भौगोलिक मानांकन असलेले पदार्थ व सेंद्रिय पदार्थ यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी, शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा तसेच प्रसारमाध्यम प्रतिनिधींनीही या प्रदर्शनास अवश्य भेट द्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत लातूर शहरातील कबाल्यांचे वाटप करावे.नगरसेविका राजश्री धोत्रे - बाहेती यांची तहसिलदारांकडे मागणी

लातूर/प्रतिनिधी : महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संपूर्ण राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. मार्च ते मे या कालावधीमध्ये हे अभियान पार पडणार असून या माध्यमातून नागरिकांच्या महसुल विभागांतर्गत असलेल्या विविध समस्यांचे समाधान करण्यात येणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून लातूर शहरातील कबाले धारकांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी भाजपाच्या प्रभाग १६ मधील नगरसेविका राजश्री धोत्रे बाहेती यांनी तहसीलदार सौदागर तांदळे यांच्याकडे पत्रकाद्वारे केली आहे.



लातूर शहरातील प्रभाग क्र. १६ सह विविध प्रभागातील अनेक नागरिकांचे कबाले अद्यापपर्यंत प्रशासनाने दिलेले नाहीत. कबाले मिळाले नसल्यामुळे या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे हे कबाले वाटप करण्यात यावे, अशी मागणी सातत्याने नागरिकांतून होत आहे. ही लोकभावना लक्षात घेवून महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपा निवडणुकीदरम्यान लातूर शहरातील नागरिकांना लवकरात लवकर कबाले वाटप करण्यात येईल, असे आश्वासित केले होते. आता निवडणुका पार पडल्या असून नुकतेच महसुल मंत्री बावनकुळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाची घोषणा केली आहे. या अभियानाच्या माध्यमातून महसुल विभागांतर्गत नागरिकांच्या असलेले समस्या तात्काळ सोडविण्याचे निर्दे श ना. बावनकुळे यांनी दिलेले आहे. सदर अभियान मार्च २०२६ ते मे २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

लातूरही या अभियानाची सुरुवात झाली असून नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरु केली आहे. याच अभियानांतर्गत लातूर शहरासह प्रभाग १६ मधील नागरिकांच्या कबाल्याचे वाटप करण्याची मागणी नगरसेविका राजश्री धोत्रे बाहेती यांनी तहसीलदार सौदागर तांदळे यांच्याकडे केली आहे. याकरिता तहसील प्रशासनाने मनपा प्रशासनासोबत बैठक घेवून कबाले वाटपासंदर्भात असलेली प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, अशीही मागणी राजश्री धोत्रे बाहेती यांनी केली आहे. त्याचबरोबर या अभियानाच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, लाडक्या बहिणींची ई-केवायसी करणे, शिधा पत्रिकांमध्ये नावांची खातरजमा करून घेवून त्यामध्ये नावे कमी - जास्त करणेयासह शैक्षणिक प्रवेशासाठी लाणाजया विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी शिबिर घेण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांबाबत तहसीलदार तांदळे यांनी सकारात्मकता दाखवली असून कबाले वाटपासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेवून अशी ग्वाही दिली आहे.

## बौद्ध धम्म हा समतेचा मार्ग - भिक्खू पय्यानंद थेरो







लातूर / प्रतिनिधी :-तथागत बुद्धाने संपूर्ण जगाला करुणा, बंधुभाव, अणि शांतीची शिकवण दिली. केवळ करुणा, बंधुता आणि शांती सदाचाराने विश्वात सामाजिक समानता प्रस्थापित होवू शकते म्हणून तथागत बुद्धाने मानवी समाजात सामाजिक दरी नष्ट करण्यासाठी समता तत्वे प्रतिपादित केले आहे. यामुळे बौद्ध धम्म हा समतेचा मार्ग असल्याचे प्रतिपादन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने फाल्गुण पौर्णिमा धम्मदेशना तथा सत्कार समारंभ प्रसंगी भंतेजी बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे व भिक्खू संघ यांच्या हस्ते वंदन करून करण्यात आली. त्यानंतर भंते बोधिराज यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले.

या प्रसंगी दिपाली आदमाने, (नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या, लातूर ), अमोल देडे (पंचायत सदस्य, लातूर), प्रा. डॉ. प्रदीप सुर्यवंशी (दयानंद महाविद्यालय, लातूर), भारत आदमाने (माजी संचालक, विकास सहकारी साखर कारखाना), पाडुरंग देशमुख (सरपंच, गोंदेगाव), जयराम येडगे, अरुण गायकवाड (पाटबंधारे अभियंता, लातूर), नागेश कांबळे (युवा उद्योजक, लातूर), गोविंद कांबळे (अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६), ज्योती मोठे (सहशिक्षक, नंदादीप माध्यमिक विद्यालय, लातूर), चंद्रशेखर मोठे (सहशिक्षक, तुळजाभवानी प्राथमिक विद्यालय, लातूर) तसेच चि. अथर्व मोठे (यु-ट्यूब स्टार) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, बौद्ध धम्म हा केवळ पूजा-अर्चेपुरता मर्यादित नसून तो आचरणाचा धम्म आहे. पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि प्रज्ञा-शील-समाधी यांच्या माध्यमातून व्यक्तीचा चारित्र्य विकास घडतो आणि त्यातूनच समाज परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. अन्याय, अंधश्रद्धा आणि भेदभाव यांचा त्याग करून भगवान बुद्धांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि बंधुता स्वीकारली तरच खऱ्या अर्थाने समताधिष्ठित समाजाची उभारणी होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अरुण कांबळे यांनी तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले.

धम्म पालन गाथेनंतर कार्यक्रमाची सांगता आशीर्वाद गाथेने झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, धम्मपाल साकळे, विलास अवशंक, आकाश सरवदे, करण ओव्हाळ, राजेश कदम, ज्योतीराम लामतुरे, पंडित सूर्यवंशी, गौतम आदमाने ई.सह महाविहार धम्मसेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

या प्रसंगी विविध नगरातील महिला मंडळ, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, समाजातील प्रतिष्ठित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२६चे सर्व सदस्य सह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती. धम्म, समता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## बालरंगभूमी परिषदेच्या बाल वक्ता वक्तृत्व स्पर्धेस अभूतपूर्व प्रतिसाद, १३५ विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून स्पर्धा संपन्न





लातूर :- बालरंगभूमी परिषद, लातूर आणि निश्चय संस्कृत क्लासेस, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित बालवक्ता वक्तृत्व स्पर्धा २०२६ मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेत १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यावेळी बालरंगभूमी परिषद, लातूर चे अध्यक्ष रणजित आचार्य, प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते विलास आराध्ये, प्रमुख कार्यवाह नवलाजी जाधव, स्पर्धा प्रमुख वसुधा पाटील, तेजश्री घवले विचार मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री आराध्ये म्हणाले की, बालरंगभूमी परिषद या डिजिटल युगात ही आगळे वेगळे कार्य करत विद्यार्थ्यांना बौद्धिक प्रगल्भ बनवत उंचीवर नेण्याचे कार्य करत आहे. वक्तृत्व स्पर्धा फक्त जिंकण्याची नाही तर त्यातून आचरण ही झाले पाहिजे. जे बोलाल त्याचा अंगीकार केला तरच वक्तृत्व खरे ठरेल.

या स्पर्धेत पहिली ते चौथी गटात प्रथम- रुद्र कृष्णा बन, द्वितीय- स्वप्नाली एकनाथ इंगळे, तृतीय- रुही राहुल इंगळे तर विशेष प्रविण्य- अक्षरा नामदेव आंधळे यांनी पटकवला. पाचवी ते सातवी गटात प्रथम- संस्कृती शिवराज खराडे, द्वितीय- ईश्वरी त्र्यंबक खाडप, तृतीय- रुद्र शिवशंकर सुरवसे यांनी क्रमांक पटकवला. आठवी ते दहावी गटात प्रथम- प्रगती अनंत जाधव, द्वितीय- समृद्धी जगन्नाथ दराडे आणि तृतीय - कल्याणी रमाकांत माने यांनी क्रमांक पटकवला.

सदरील स्पर्धे चे तज्ञ परीक्षक म्हणून सुप्रसिद्ध शिव व्याख्याते अरुणजी धायगुडे आणि प्रा. आशिष स्वामी उपस्थित होते. या स्पर्धेचे सूत्रसंचालन विशाल वाटवडे यांनी केले तर प्रास्ताविक स्पर्धा प्रमुख वसुधा पाटील यांनी केले. आभार तेजश्री घवले यांनी मानले.

सदरील वक्तृत्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बालरंगभूमी परिषद, लातूर चे अध्यक्ष रणजित आचार्य, प्रमुख कार्यवाह नवलाजी जाधव, स्पर्धा प्रमुख वसुधा पाटील, भिमराव दुनगावे, तेजश्री घवले, विशाल वाटवडे, सुमती बिडवे-सोमवंशी, सुवर्णा बुरांडे, तन्मय रोडगे, रविकिरण सावंत, कृष्णा शिंदे आणि अभिजित भड यांनी परिश्रम घेतले.

## विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत यांच्या तर्फे रामेश्वर येथे राष्ट्रधर्मपूजक - दादाराव कराड स्मृती महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धेचे आयोजन



लातूर - विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक- दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी होणार आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे. समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै. नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच, हिंद केसरी पै. जगदीश कालीरमण हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र श्री पै. विजय उर्फ विकी बनकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार आहे.,राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील महावीर केसरी गटातील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/-, तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, मेडल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, आरोग्य शास्त्रातील एक महान चमत्कार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंच्याहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना योग महर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा स्मृती सुवर्ण, रौप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल.

सर्व मल्लांची वजने सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी सायं. ४ ते ८ पर्यंत घेतली जातील. सर्व कुस्तीगीरांनी आधारकार्डची मूळ प्रत व त्याची झेरॉक्स प्रत आणणे बंधनकारक आहे. स्पर्धा राज्य संघटनेच्या नियमानुसार घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतीही प्रवेश फी आकारली जाणार नाही. स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व कुस्तीगीरांच्या जाण्या-येण्याचे एस.टी.भाडे, निवासाची व भोजनाची व्यवस्था संयोजकांतर्फे करण्यात येईल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रा. विलास कथुरे (मो. नं.९८५०२११४०४), पै. राहुल बिराजदार (मो.नं.८००७५९३४३४), यांच्याशी संपर्क साधावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर या कुस्ती स्पर्धे साठी क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. महेश थोरवे आणि क्रीडा विभागाचे संचालक डॉ. वैभव वाघ यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

# संभाजी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त व्याख्यान संपन्न



मुरुड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात दि. २३/०२/२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवव्याख्याते प्रा. डॉ. सतीश कदम यांचे व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. गणेशराव ढोकळे पाटील उपस्थित होते. तसेच मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक काळम, प्रा. पैठणकर एन.एल., प्रा. मधुकर क्षीरसागर यांचीही यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पुजनाने तसेच राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचीही जयंती असल्याने राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी केले यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य आणि पराक्रमाचा आढावा घेतला. शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याने आणि चतुर्याने शत्रूवर मात केली आणि स्वराज्याची उभारणी केली तसेच महाराजांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना करून कल्याणकारी राज्याची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराज एक योद्धाच नाही तर ते एक आदर्श राजा होते. असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक शिवव्याख्याते प्रा. डॉ. सतीश कदम म्हणाले की, राजमाता जिजाऊंचा संस्कार छत्रपती शिवाजी महाराजांवरती झालेला होता म्हणून मृत्यूनंतर शत्रुचा देखील सन्मान करण्यात आला. तसेच शिवरायांच्या विचाराने माणूस सक्षम होतो म्हणून शिवरायांचा विचार आजच्या तरुणांनी आत्मसात करून आचरणात आणणे गरजेचे आहे. यावेळी डॉ. कदम यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजांच्या इतिहासाचे संकलन करताना आलेले देश – विदेशातील अनुभव कथन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तृत्वामुळे संपूर्ण भारतात त्यांची ख्यातकीर्त आहे. म्हणून त्यांना समजून घेण्यासाठी आजच्या विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचली पाहिजेत असे आवाहनही त्यांनी केले. मोबाईल मध्ये विश्व आहे त्या मोबाईलचाही आपण योग्य वापर करावा असे ते यावेळी म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना मा. गणेशराव ढोकळे पाटील म्हणाले की, शिव, फुले, शाहू, आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. आपले महापुरुष हे आपले आदर्श आहेत. महापुरुषांना डोक्यावर न घेता आपण डोक्यात घेतले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात स्त्रीयांचा सन्मान केला गेला. स्त्रियांचा आदर करणारे शिवाजी महाराज होते. सद्य स्थितीत विविध कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांची आरती केली जात आहे. आरती करणे म्हणजे त्यांचे दैवतीकरण करण्यासारखे आहे. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे दैवतीकरण होता कामा नये. छत्रपती शिवाजी महाराज हे खूप मोठे राजे आहेत म्हणून त्यांचा आपण सन्मान करावा व विचार आचरणात आणावा असेही ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अश्विनी टेकाळे हीने केले तर आभार कु. आकांक्षा पिसाळ हिने मानले. यावेळी कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त स्वामी विवेकानंद माध्यमिक विभाग शाळेमध्ये भव्यदिव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न



केज प्रतिनिधी: दि. ३ फेब्रुवारी– जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्यदिव्य असे विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये ५ वी ते ६ वी ( लहान गट ) व ७ वी ते ८ वी ( मोठा गट ) या दोन गटामध्ये मिळून एकूण ४३ विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन जीवन विकास शिक्षण मंडळ केज या संस्थेचे सचिव जी. बी. गदळे शाळेचे माजी मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक बी. पी. तिडके, ज्ञानसागर कोचिंग क्लाससेस चे संचालक प्रा. सिद्धेश्वर वायबसे शाळेच्या मु. अ. शिवनंदा मुळे यांनी केले. उद्घाटनानंतर या कार्यक्रमाचे परीक्षण शाळेतील विज्ञान शिक्षिका श्रीमती. गुंड मॅडम, विटेकर मॅडम तसेच तट सर व मैंद सर यांनी केले.

सर्व विध्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट व विलोभनीय असे प्रयोग सादर केले. यामध्ये विध्यार्थ्यांनी लेझर तंत्रज्ञानाद्वारे पाण्यातील जिवाणू ओळखणे, भूअंतर्गत भूकंपाच्या हालचाली, स्वामी विवेकानंद स्मार्ट स्कूल, व इतर असे उल्लेखनीय प्रयोग सादर केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनामध्ये लहान गटातून स्वरा राऊत हिने प्रथम पारितोषिक पटकावले. सोहम कापरे याने द्वितीय तर अनुज चाळक व विराज शिंदे यांनी तृतीय पारितोषिक मिळविले. तर मोठ्या गटातून अजय आदमाने व अथर्व नेहरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर शौर्य बारगजे व वेदांत राऊत यांनी द्वितीय तर सुदर्शन शिंदे याने तृतीय पारितोषिक मिळविले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शाळेतील विज्ञान शिक्षक तट सर तसेच त्यांचे सहकारी यांनी केले.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी. बी. गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काजी, संचालक नारायण अण्णा अंधारे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित राहिले व कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# मुस्लिम समाजाबाबत बेताल वक्तव्य करणाऱ्या आमदार महेश लांडगेवर गुन्हा दाखल करून अटक करावे–लखन हजारे




केज/प्रतिनिधी.–मुस्लिम समाजाबाबत बेताल वक्तव्य करणाऱ्या जातीयवादी आमदार महेश लांडगे वर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे बहुजन विकास मोर्च्याचे केज तालुकाध्यक्ष लखन हजारे यांनी तहसीलदार केज यांच्याकडे केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, रमजानच्या पवित्र महिन्यात मुस्लिम समाजाविरुद्ध बेताल,विकारी वक्तव्य करून राज्यामध्ये दंगे भडकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या जातीयवादी आमदार महेश लांडगे यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी. अशा मागणीचे लेखी निवेदन बहुजन विकास मोर्चा केज तालुक्याच्या वतीने देण्यात आलेले आहे.

माध्यमांशी बोलताना लखन हजारे म्हणले की, आमदार महेश लांडगे यांनी मुस्लिम समाज बांधवा विषयी गरळ ओकून बेताल वक्तव्य केले आहे. त्यामुळे मुस्लिम समाज बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. या लोकप्रतिनिधींना मुस्लिम समाज बांधवांची फक्त मते चालतात. मग यांना मुस्लिम बांधवांची ऍलर्जी का आहे? असा हजारे यांनी सवाल उपस्थित केला. पुढे बोलताना लखन हजारे यांनी म्हटले की, लवकरात लवकर प्रशासनाने आमच्या निवेदनाची दखल घेतली नाही तर आम्ही लवकरच बहुजन मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली संबंध राज्यभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारणार आहोत.

सदर मागणीचे निवेदन हे केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले.

या लेखी निवेदनावर तालुकाध्यक्ष लखन हजारे, उपाध्यक्ष रोहन बचुटे, सोशल मीडिया तालुकाप्रमुख किशोर गरुड, शहर उपाध्यक्ष ऋषिकेश मस्के, शहर कार्याध्यक्ष मनोज मस्के यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# केज तालुक्यातील विडा गावची ९९ वर्षाची परंपरा कायम; धुलीवंदन निमित्त जावयाची गाढवावरून मिरवणूक



केज/प्रतिनिधी.–केज तालुक्यातील विडा गावची ९९ वर्षाची परंपरा कायम चालू आहे. धुलीवंदन निमित्त जावयाची गाढवावरून मिरवणूक काढून जावयाल हनुमान मंदिर येथे कपड्याचा आहेर देण्यात आला आहे.

जावयाला कार्यक्रम बघण्यासाठी आणले आणि गाढवावर बसवले.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील विडा या गावात गेल्या ९९ वर्षापासून अनोख्या पद्धतीने धुळवड साजरी केली जाते. यामध्ये दरवर्षी जावयाचा शोध घेण्यासाठी विडा ग्रामस्थ हे १५ ते २० दिवस जावयाला पकडण्यासाठी वेगवेगळे पथक तयार करून प्रत्येक गावातून जावयाचा शोध घेऊन धुळवडीच्या दिवशी जावयाला पकडून आणून त्यांची गाढवावर बसून गाढवाच्या गळ्यात चप्पल बुटाचा हार घालून जावयाची संपूर्ण गावभर मिरवणूक काढून हनुमान मंदिराच्या पारावर जावयांना आणून कपड्याचा आहेर व पाच ग्रॅम सोन्याची अंगठी देत आहेत परंतु या वर्षी सोन्याचे भाव वाढले असल्याने यावर्षींच्या जावयांना पाच ग्रॅम सोन्याच्या अंगठी च्या सन्मानापासून वंचित राहावे लागले आहे अशी चर्चा जावयाच्या मिरवणुकीच्या वेळी ऐकण्यास मिळाली.

यावर्षीचा मान हा मूळचे चिंचोली माळी येथील रहिवाशी असलेले व सध्या गेल्या ३८ वर्षापासून विडा येथे रहिवाशी असलेले शिवाजी दादाराव गालफाडे वय ६५ वर्षे यांना मंगळवारी सकाळी ठीक ९–०० वा. दरम्यान आपल्याला कार्यक्रम पाहण्यासाठी बाहेर जायचे आहे असे म्हणून ग्रामस्थांनी त्यांना बाहेर आणले. शिवाजी गालफाडे यांना कसलीही पूर्वकल्पना अथवा माहिती न देता थेट गाढवावर बसवले. मला व माझ्या परिवाराला जावई सापडला आहे असे दोन दिवसांपासून सांगण्यात आले होते त्यामुळे मी निश्चित राहिलो याचाच गैरफायदा घेत विडा ग्रामस्थांनी मला आजच्या या कार्यक्रमाचा मानकरी म्हणून माझी मिरवणूक काढली जात आहे यामुळे एका मनाने दुःख वाटते तर एक आजचा हा सन्मान मिळाल्याचे ही भाग्य मानतो असे माध्यमांशी बोलताना शिवाजी गालफाडे यांनी सांगितले.

ही परंपरा ९९ वर्षांपूर्वी आनंदराव देशमुख यांनी आपल्या लातूरचे मेहुणे यांची थट्टा मस्करी म्हणून गाढवावरून बसून मिरवणूक काढली होती. तीच परंपरा कायम राखत दरवर्षी विड्यातील जावयांची गाढवावर बसून मिरवणूक काढली जात आहे.

तसेच ग्रामस्थांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला लहान थोर मंडळींनी सहभाग घेतला होता शेवटी जावयाचा सन्मान करण्यासाठी राजा हनुमान मंदिरासमोर कपड्याचा आहेर देऊन या कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी सरपंच सुरज पटाईत व पोलीस कर्मचारी यांनी जावयाचा मानसन्मान करून कपड्यांचा आहेर देऊन या कार्यक्रमाची सांगता केली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.